**अहमदनगर येथील प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे नवीन इमारतीतील न्यायालयात, मुक्काम अहमदनगर येथे दुरुस्त न होणा-या मशीन चा जाहिर लिलावाने विक्री.**

**<u>जाहीर लिलाव</u>**

अ) नेमलेली तारीख <u>२३/१२/२०२४</u> तमाम जनता, व जुने दुरुस्त न होणारे झेरॉक्स मशीन खरेदी करणारे इच्छुक खरेदीदार यांना याव्दारे जाहीर करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील झेरॉक्स मशीन याचा जाहीर लिलावाने विक्री करण्याचे ठरविले आहे. सदरचा लिलाव तारीख <u>२३/०१२/२०२४</u> रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे नवीन इमारतीत दुपारी **१२.०० ते २.००** वाजता लिलाव बोलीने विक्री करण्याचे ठरविलेले आहे. लिलावाची बोली नवीन इमारत जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे लावण्यात येईल.

ब) लिलावाच्या अटी-- सदर लिलाव घेणा-यांना पुढील अटीवर लिलावाची बोली बोलावी लागेल.

**<u>लिलावाच्या अटी खालिलप्रमाणे-</u>**

१) लिलाव घेणा-यांनी लिलावाचे तारखेच्या दिवशी अगर तत्पूर्वी कार्यालयात येऊन सुटीचे दिवस सोडून सकाळी १०.३० ते ६.०० या वेळेत यादीत नमूद केलेले एक मशीन पाहून घ्यावे.

२) लिलाव घेणा-यांनी दिनांक २३/१२/२०२४ रोजी वर निर्दिष्ट केलेल्या ठिकाणी लिलाव बोलीचे कामी हजर रहावे व आपले नांव, पत्त्याची नोंदणी करावी.

३) लिलाव घेणा-यांनी बोली कायम झाल्यावर एकूण लिलाव रकमेच्या सर्व रक्कम ताबडतोब जमा करावी.

४) लिलाव कायम करण्याचे अधिकारी व अखेरचा निर्णय मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अखत्यारीत राहील.

५) लिलाव बोली ही त्यावेळी हजर असलेले न्यायालयाचे बेलिफ यांच्यामार्फत बोलली जाईल.

६) विक्रीच्यावेळी आम जनतेपैकी कोणालाही व्यक्तीशः किंवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत बोली करण्याची मुभा राहील.

७) बोलीच्या रकमेबाबत वाद निर्माण झाल्यास ताबडतोप पुन्हा लिलावाची बोली करण्यात येईल.

८) सर्वाधिक बोलीमध्ये देऊ केलेली रक्कम अपुरी वाटल्यास बोली नाकारण्याचा अधिकार प्रशासनास राहील.

९) खरेदीदार व्यक्तीस अखेरची समजून घोषित केल्यास खरेदीदाराने एकुण खरेदी रक्कम ताबडतोब भरली पाहिजे, रक्कम न भरल्यास त्याचवेळी पुन्हा अधिका-यांच्या परवानगीने पुढे लिलाव सुरु करण्यात येईल.

१०) खरेदी किंमतीची रक्कम मुदतीत भरण्यास कसूर झाल्यास विक्रीची नवीन अधिसूचना काढून एक मशीन ची पुन्हा विक्री करण्यात येईल. अशा प्रसंगी अनामत रक्कम बोली देणा-यास परत करण्यात येणार नाही.

११) सदर लिलाव प्रक्रियेमध्ये सर्वाधिक बोलीव्दारे लिलाव घेणा-या व्यक्तींना, त्यांनी न्यायालयातील न्यायीक अधिकारी अथवा कर्मचारी यांचेवतीने सहभाग घेतला नसल्याबाबत तसेच न्यायालयातील न्यायीक अधिकारी अथवा कर्मचारी योंचेशी नातेसंबध अथवा हितसंबंध नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

आज दिनांक१९/१२/२०२४ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी जाहीर केले असे.

जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर
दिनांक-१९/१२/२०२४

प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अहमदनगर

**ले.व.वि./जा. क्र./ १९८२ /२०२४ दि.१९/१२/२०२४.**

**प्रत**-१. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथील नोटीसबोर्ड.
२. दिवाणी न्यायालय, व.स्तर, अहमदनगर येथील नोटीसबोर्ड.
३. मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर येथील नोटीसबोर्ड.
४. जिल्हाधिकारी अहमदनगर येथील नोटीसबोर्ड
५. तहसील कार्यालय, अहमदनगर येथील नोटीसबोर्ड.
६. जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचे अधिकृत वेब साईटवर.

**प्रति,**

**मा. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अहमदनगर यांचे कडे बजावणी करिता सादर.**

सहाय्यक अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अ.नगर.

लिलावाचे वस्तुचा तपशिल

| अ.न. | वस्तुचा तपशिल | नवीन इमारत नग | एकुण नग |
|---|---|---|---|
| १. | झेरॉक्स मशीन No Sharp मॉडेल नं. No AR-5631 | १ | १ |

१ झेरॉक्स मशीनची एकुण किंमत रूपये ७,१२०/— (घसारा वजा किंमत १० %)